वयोवृद्धः मनोयुवा

**महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम), मुंबई**

संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी क्रमांक : बी.ओ.एम./८४३/८/जीबीबीएसडी दि. २६/११/१९८१
मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नियम १९५० अन्वये नोंदणी क्रमांक : एफ-७५२८ (मुंबई) दि. २५/४/१९८२
कार्यालय पत्ता : ज्येष्ठ नागरिक भवन, सेक्टर १२, प्लॉट नं. ७ सी, गावदेवी मंदिरामागे, नेरूळ (प.), नवी मुंबई - ४०० ७०६.

# फेस्कॉमचे मुखपत्र : मनोहारी मनोयुवा

कार्यालय : अ/७, मिरज-मालगांव रस्ता, सुभाषनगर, ता. मिरज, जि. सांगली - ४१६ ४३७.

वर्ष-३१ | अंक-५ | मे २०२३


## ज्येष्ठांनो, या उन्हाळ्यामध्ये तहानलेल्या पक्षांसाठी आपल्या घरी/गच्चीत/अंगणात/बाल्कनीत/झाडावर पिण्याच्या पाण्याची सोय करा... आणि पक्ष्यांचा जीव वाचवा..







## आधारस्तंभ



### डॉ. विजयकुमार नेमगोंडा पाटील

पत्ता : श्री होमिओपॅथिक क्लिनिक, ४४, यशवंत हौसिंग सोसायटी, सन्मती हॉलसमोर, जयसिंगपूर. ता. शिरोळ, जि. कोल्हापूर.


शिक्षण : एम.डी. (होमिओपॅथी) **मोबाईल नं. :** ९९६०२७७४७५

सेवा : उपप्राचार्य, डॉ. जे. जे. मगदूम होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, जयसिंगपूर.
माजी प्राध्यापक, होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, कोल्हापूर.
माजी सचिव, आय.एम.ए. जयसिंगपूर,
नगरपालिकेच्या दवाखान्यात माजी मानद कन्सल्टंट.
संस्थापक अध्यक्ष, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ होमिओपॅथिक फिजिशियन संस्था, जयसिंगपूर.

सामाजिक कार्य : वैद्यकीय सेवा, मोफत वैद्यकीय शिबीरे.

छंद : लेखन, वाचन, मोफत आरोग्य सेवा.

---



अध्यक्ष
प्रभाकर बाळासाहेब पाटील

### ज्येष्ठ नागरिक संघ व पेन्शनर्स स्वयंसेवी संस्था, कवलापूर. ता. मिरज, जि. सांगली.

**स्थापना** : १९९८

**अध्यक्ष** : प्रभाकर बाळासाहेब पाटील

उपाध्यक्ष : प्रकाश रामचंद्र टकले, सचिव : सदाशिव शिवराम माळकर

कार्यक्रम : १) आर्थिक लाभाच्या योजनाद्वारा लाभ मिळवून देणे.
२) आरोग्य व्याख्याने, शिबीरे यांचे आयोजन करणे.
३) बौध्दिक व शारीरिक स्पर्धा, विविध दिन साजरे करणे.

## मनोहारी मनोयुवा अंकास हार्दिक शुभेच्छा...!

### सौ. कांचन यशवंत शिंदे

बी-६, कल्पतरू को-ऑप. हौसिंग सोसायटी, सर्वोदयनगर, एस.पी.एस. मार्ग, भांडूप (प.), मुंबई - ४०० ०७०. मोबा. ९५९४६ ४४६८३



बृहन्मुंबई महानगरपालिकेचे वतीने तसेच यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे वतीने 'कर्तबगार ज्येष्ठ नागरिक' पुरस्कार, सम्राट मित्र मंडळ, मुंबईचे वतीने 'उत्तम समाजसेविका' पुरस्कार व फेस्कॉमचे वतीने 'उत्कृष्ट ज्येष्ठ महिला कार्यकर्ती' पुरस्कार (२००७) प्राप्त.



### श्री. एम. ए. मोडक

रा. आकुर्डी, पुणे (वय ९२)
फेस्कॉम मनोयुवा कौन्सिलचे आर्थिक आधारवड.

# राज्यस्तरीय महिला अधिवेशन आणि मनोहारी मनोयुवा आनंद मेळावा

## * प्रतिक्रिया *

श्री. अशोक तेरकर,
डॉक्टर, मायाताई कुलकर्णी,
मेजर, डॉक्टर, निर्मलाताई कोरे मॅडम

स.न.वि.वि.

फेस्कॉमचे राज्यस्तरीय महिला अधिवेशन व मनोहारी मनोयुवा चा मेळावा दि. १९/२० मार्च २०२३ रोजी नांदेड नगरीत भव्य दिव्य स्वरुपात संपन्न झाले. यांचे सर्व श्रेय हे आपणा त्रिमुर्तीस व आपल्या सर्व टिमला आहे. वास्तविक दि.२३/१२/२०२२ रोजीच्या फेस्कॉम नियामक मंडळ सभेत ठरावाद्वारे या फेस्कॉमच्या राज्यस्तरीय महिला अधिवेशनास व मनोहारी मनोयुवा मेळाव्यास परवानगी दिली होती.

अत्यंत कमी वेळेत आपण हे अधिवेशन संपन्न केले आहे, त्याबद्दल प्रथमतः तुमचे व सर्व टिमचे मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन व शुभेच्छा !!

या सोहळ्यास संपूर्ण महाराष्ट्रातून ज्येष्ठ महिला व पुरुष आले होते. विशेष म्हणजे नांदेडचे पाकमंत्री मा. गिरीश महाजन साहेब, सर्व आमदार, खासदार, जिल्हाधिकारी हे आवर्जुन उद्घाटनाला उपस्थित राहिले. आलेल्या सर्वांची राहण्याची व्यवस्था चोख बजावली गेली. मातोश्री मंगल कार्यालय सर्व सोयींनी उपयुक्त व प्रशस्त होते.

दोनही दिवस उत्तम चहा नाश्ता, भोजन व्यवस्था कोणताही गडबड गोंधळ न होता सर्वांना योग्य पध्दतीने मिळाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व नियोजन सर्व महिला वर्गाने आनंदाने व उत्साहाने पार पाडले. सर्व मान्यवर, पुरस्कार विजेते, हौशी कलाकार यांचे सत्कार करण्यात आले.

मनोहारी मनोयुवा मेळावा व विशेष अंकाचे प्रकाशन, यावल समाचारचे प्रकाशन, विविध पुस्तकांचे प्रकाशन, महिला संघांचे कार्य, त्यांचे विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम संपन्न झाले. आईस्कॉनचे अध्यक्ष श्री.विश्वासराव भदाने, सेक्रेटरी जनरल श्रीधर सिध्दये यांची उपस्थिती हे एक वैशिष्ट्य होते.

सर्व प्रादेशिक विभागांचे अध्यक्ष व सचिव यांचे सत्कार करण्यात आले. स्थानिक वक्त्यांची भाषणे खूपच प्रभावी झाली. अण्णासाहेब टेकाळे यांनी एमआयटीकडून आलेल्या सर्वांना बॅगेच्या स्वरुपात किट्सचे वाटप करुन आर्थिक भार हलका केला. सर्वांना हे राज्यस्तरीय महिला अधिवेशन कायमस्वरुपी लक्षात राहिल असेच झाले. निरोप घेताना सर्वांचे पाय जड झाले होते. पाय निघत नव्हते, परत परत नांदेडला यावेसे वाटत होते, यातच अधिवेशनाचे व आपणा तिघांचे व  आपल्या सर्व टिमचे यश आहे.

फेस्कॉम परिवाराच्या वतीने तुमचे हार्दिक अभिनंदन व शुभेच्छा !

अरुण रोडे
अध्यक्ष

अण्णासाहेब टेकाळे
उपाध्यक्ष

महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ फेस्कॉम नेरुळ नवी मुंबई

# फेस्कॉम मनोयुवा कौन्सिल तर्फे साहित्यिकांचा गौरव

नांदेड नगरीत राज्यस्तरीय महिला अधिवेशन दि. १९ व २० मार्च २०२३ रोजी संपन्न झाले. या अधिवेशनाचा एक भाग मनोहारी मनोयुवा मासिकाचा आनंद मेळावा संपन्न झाला. या आनंद मेळाव्यातच काही लेखक/लेखिका यांनी गेल्या दोन वर्षांत स्वलिखित विविध विषयांवर लेख, कथा, कविता, मनोयुवा कौन्सिलला पाठविल्या. तसेच २०२२ मध्ये ३६ जिल्ह्यांपैकी १३ जिल्ह्यातील ७८ महिलांनी महिला दिनानिमित्त विशेष लेख पाठविले. या आनंद मेळाव्यात काही लेखक/ लेखिका यांचा गौरव करणेचे ठरविले. साहित्यिक तथा लेखक/लेखिका/कवि यांचा यापूर्वी गौरव केला गेला नसलेने काही साहित्यिकांच्या जिवनात किमान एक दिवशीय आनंद निर्माण करणेचे ठरविले. कौन्सिलने काही साहित्यिकांची नावे निवडून त्यांचा १९ अगर २०च्या आनंदमेळाव्यात गौरव करणेचे ठरविले. या साहित्यिकांचा गौरवपत्र, स्मृतीचिन्ह आणि नॅपकीन बुके मान्यवरांचे शुभहस्ते देऊन त्यांच्या जीवनात आनंदाचा क्षण निर्माण करणेत आला. सत्कारमूर्तींची नावे खालीलप्रमाणे,-

१) भारती मोरे, डोंबिवली
२) सौ. स्नेहल शांताराम विशे, ऐरोली-मुंबई
३) सौ. मंजुळा श्रीमंत साळे, तासगाव
४) सौ. वंदना दिलीप घाटगे, सांगली
५) सौ. उषा उत्तमराव जाधव, जयसिंगपूर
६) सौ. नंदा दिलीप पवार, पुणे
७) सौ. वासंती विवेक देशपांडे, डोंबिवली (पूर्व)
८) सौ. जयश्री निलेश पावडे, महापौर, नांदेड-वाघाडा महानगरपालिका
९) सौ. सविता बिरगे, शिक्षणाधिकारी (प्रा), जि.प. नांदेड
१०) सौ. भागिरथी मा. बच्चेवार, नांदेड
११) डॉ. ज्योती कदम, नांदेड
१२) प्रा. डॉ.सौ. सुशिला ओडेयर, कोल्हापूर
१३) चंदा कलावंत, जत
१४) श्रीमती अलका विंचू, खेड (रत्नागिरी)
१५) डॉ.गोपाळ दा. फेराडे, जळगांव
१६) श्री. अवधुत म्हमाणे, सोलापूर
१७) श्री.आनंदराव शिंदे, फलटण
१८) श्री.विश्वनाथ पंडीत, पुणे
१९) प्रा. रमेश कुलकर्णी, औरंगाबाद
२०) डॉ. व्यंकटेश जंबगी, विश्रामबाग, सांगली
२१) दिपलक्ष्मी परुळेकर, नेरुळ मुंबई
२२) सौ. प्रतिभा कुलकर्णी, नेरुळ मुंबई
२३) नमिता वाडकर, नेरुळ मुंबई
२४) श्रीमती कादंबरी गजानन देखमुख, सातारा
२५) निबा पुना बंडगुजर, एरंडोल
२६) श्री. एम. बी. तोडकर, बुधगांव (सांगली)
२७) सौ. पुनम प्रकाश पिंपरकर, बुलढाणा
२८) सौ. शीला वासुदेव कांबळे, यवतमाळ
२९) सौ.अपर्णा चांदरकर, औरंगाबाद
३०) निर्मला गोडसे, ठाणे (उत्तर)
३१) श्री. सुरेश लक्ष्मण पवार, लासलगाव
३२) श्री.प्रा. संजय ठिगळे, सांगली
३३) श्री. मोहन माने, सावर्डे (सांगली)

उपरोक्त साहित्यिकांना मान्यवरांचे हस्ते आणि मनोयुवा कौन्सिलचे वतीने यथोचित सत्कार झालेबद्दल त्यांना अतिशय आनंद झाला. या प्रकारचा सत्कार झालेमुळे निर्माण झालेला आनंद यापूर्वी कधी घडला नसलेच्या भावना साहित्यिकांनी व्यक्त केल्या.

या गौरवाचा प्रथम मान कोल्हापूरच्या प्रा.डॉ.सौ. सुशिला ओडेयर यांना द्यावा लागेल. ज्यावेळी त्यांना ही कल्पना समजली त्याचवेळी त्यांनी गौरवपत्र, स्मृतीचिन्ह इ. च्या खर्चाचा भार उचलला. अनपेक्षितपणे त्यांनी उदारहस्ते देणगी देवून मनोयुवा कौन्सिलला आर्थिकदृष्ट्या सहकार्य केले त्याबद्दल त्यांना शतशः धन्यवाद.

यापुढे देखील कौन्सिलच्या आनंदमेळाव्यात साहित्यिकाची परंपरा तेवत ठेवणेची असलेने साहित्यिकांनी आपले विविध विषयावरील लेख/कथा/कविता कौन्सिलला पाठवावेत.

सर्वच लेखक/लेखिका/कथाकार/कवि (साहित्यिक) यांचे आभार आणि भावी काळात आपल्या मनाच्या कोपऱ्यात साठविलेल्या कल्पना शब्दरुपी स्वरुपात आम्हास पाठवाव्यात अशी आपणांस विनंती करणेत येत आहे.

***



रेठरे हरणाक्ष (ता. वाळवा, जि. सांगली) येथे नवीन संघाचा प्रस्ताव अध्यक्ष मोहन मोरे व उत्तम मोरे यांचेकडून स्विकारताना प्रा.वि. सचिव रंगराव देसाई.



जत तालुक्यातील अंत्राळ येथे नवीन संघाचा प्रस्ताव स्विकारताना प्रा. वि. सदस्य यशवंतराव जगताप व ज्येष्ठ नागरिक.



रेठरे हरणाक्ष (ता. वाळवा, जि. सांगली) येथे नवीन संघाचा प्रस्ताव अध्यक्षा शालन खराडे यांचेकडून स्विकारताना तालुका सचिव प्रा. डी. के. पाटील व इतर



सांगली येथे सावली बेघर निवारा केंद्रात ४० किलो साखर, ४० किलो शेंगदाणे, ४० किलो रवा व ४० किलो पोहे भेट देताना आधार संघाचे पदाधिकारी श्री. मुरसल व चाँद गवंडी, बेघर नागरिकांसह.



नियामक मंडळाचे सभेत दक्षिण मराठवाडा प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष डॉ. बी. आर. पाटील व सचिव प्रभू कापसे यांनी १०० नवीन संघांचे प्रस्ताव सादर केले त्या प्रसंगी.



ज्येष्ठ कवयित्री श्रीमती रेवती श्रीकृष्ण पुराणिक (एम.ए.बी.एड., वय ९४) यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना फेस्कॉम अध्यक्ष अरुण रोडे व इतर



महिला दिनाचे औचित्य साधून कापूरवाडी येथील ओम शांती महिला ज्येष्ठ नागरिक संघाचा प्रस्ताव श्रीमती मंगला पाटील व सौ. विमल खोत यांचेकडून स्विकारताना श्री. अहिरेकर व सर्जेराव पाटील.


Periodical Registered with Registrar of Newspaper for India (RNI) No. MAHMAR/2003/10732
Postal Licence Reg. No. : SGL/133/2021-2023



नांदेड महिला अधिवेशनात आरोग्यमंत्री व पालकमंत्री मा. ना. गिरीश महाजन साहेब यांचे शुभहस्ते
'जीवन गौरव पुरस्कार'
स्विकारताना फेस्कॉमचे उपाध्यक्ष
**श्री. आण्णासाहेब टेकाळे.**
सोबत सन्मानपत्र →

फेस्कॉम
# सन्मानपत्र
२०२३

**5 वे**
**फेस्कॉमचे राज्यस्तरीय महिला अधिवेशन आणि मनोहारी मनोयुवा आनंद मेळावा**



**माननीय,**
**अण्णासाहेब शहाजीराव टेकाळे,**

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अवघ्या काही दिवसातच आपला जन्म झाला. वारकरी संप्रदायाच्या भक्तिमय वातावरणात आपले बालपण गेले. तोच साधेपणा, सचोटी आणि कर्तव्यनिष्ठा सोबत घेऊन आपण आपल्या ध्येयाच्या वाटेवरुन अखंडपणे चालत राहिलात. शालेय आणि महाविद्यालयीन आयुष्यात आपल्या बुध्दिमत्तेच्या बळावर आपण कायम चमकत राहिलात. गरीबीचे चटके सोसत असतांना देखील पायाखाली येणाऱ्या निखाऱ्यांना फुलांसारखे गोंजारत आपण आपल्या ध्येयापर्यंत पोहोचलात. वस्त्रोद्योग व पणन, गृहविभाग, मदत व पुनर्वसन विभाग, महसूल व वन विभाग अशा विभागांमध्ये आपण स्वीय सहाय्यक म्हणून काम करतांना आपल्या कामाची यशस्वी मोहोर उमटवत राहिलात. जनसामान्यांच्या प्रश्नांकडे अत्यंत संवेदनशीलपणे पहात ते सोडवण्यासाठी आपण अथक परिश्रम घेतले.

निवृत्तीनंतर ज्येष्ठ नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी शासन दरबारी आपण अनेक प्रयत्न केले. ज्येष्ठ नागरिक संघ नेरुळ, महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ, अखिल भारतीय ज्येष्ठ नागरिक महासंघ, दिल्ली इत्यादी विविध संघटनांवर आपण गेली कित्येक वर्षांपासून कार्यरत असून तिथे सन्मानाची पदे आपण भुषविली आहेत. शासकीय पातळीवर ज्येष्ठ नागरिकांना विविध सोयी सवलती मिळाव्यात यासाठी आपण सातत्याने पाठपुरावा करीत आहात. जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त आणि ज्येष्ठांच्या इतर कार्यक्रमाबाबत सह्याद्री दुरदर्शन वर आपण अनेक वेळा सहभाग नोंदवून ज्येष्ठांविषयी समाजाला मार्गदर्शन केले आहे. आपण ज्येष्ट नागरिकांसाठी करत असलेल्या कार्याची दखल आयबीएन-लोकमतने घेतली हे विशेष होय. आपल्या उत्कृष्ट सेवेबद्दल आपल्याला मा.राज्यपाल महोदयांच्या हस्ते सन्मानित करयात आले, तो क्षण विशेषतः संस्मरणीय होय.

मुळातच धार्मिक मनोवृत्ती आणि अथक परिश्रमाची सवय या दोन गुणांची योग्य ती सांगड घालून आपण आपल्या शासकीय सेवेत कार्यरत राहिलात. जनसेवा हीच ईश्वरसेवा समजून आपण निवृत्तीनंतरही सदैव ध्येयमग्न आहात. ज्येष्ठांसाठी अखंड कार्य करत राहून आपण समाजासमोर भरीव आदर्श निर्माण केला. ध्रुवताऱ्यासारखे अढळ स्थान आपण आपल्या कर्तव्यपरायणतेमुळे मिळवले.

**आपल्या याच कामाचा सन्मान व्हावा म्हणून फेस्कॉमच्या वतीने आपल्याला जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात येत आहे.**

आकाशगंगेत अनेक तारे असले तरी ध्रुवताऱ्यासारखे अढळपद मिळविणारा एकमेव तारा असतो. असे अविचल व निरामय अढळपद मिळवणाऱ्या आपल्यासारख्या ताऱ्यास जीवन गौरव पुरस्कार प्रदान करताना आम्हाला आभाळभर आनंद होत आहे.

**अरुण रोडे**
अध्यक्ष, फेस्कॉम

**अशोक तेरकर**
अध्यक्ष, मराठवाडा प्रा.वि.उ.

**डॉ.सौ.निर्मला कोरे**
अध्यक्ष,
महिला आघाडी मराठवाडा प्रा.वि.उ.

**सीमा आगवणे**
सचिव, महिला आघाडी, फेस्कॉम

**विवेक देशपांडे**
मुख्य सचिव, फेस्कॉम

**जयवंत सोमवाड**
सचिव, मराठवाडा प्रा.वि.उ.

थोर उद्योजक, स्व. गणपतरावजी बळवंतआप्पा मोरगे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ



नांदेड महिला अधिवेशनात आरोग्यमंत्री व पालकमंत्री मा. ना. गिरीश महाजन साहेब यांचे शुभहस्ते
'फेस्कॉम महिला भूषण पुरस्कार'
स्विकारताना महिला आघाडीच्या अध्यक्षा
**डॉ. सौ. मायाताई कुलकर्णी.**



नांदेड महिला अधिवेशनात उत्कृष्ट साहित्यिक म्हणून महिला आघाडीच्या अध्यक्षा डॉ. सौ. मायाताई कुलकर्णी यांचे हस्ते पुरस्कार स्विकारताना आदर्श माता पुरस्कार मानकरी आणि ग्रामपंचायत सदस्या सौ. मंजुळा साळे. सोबत फेस्कॉम अध्यक्ष, उपाध्यक्ष व इतर. देणगीबद्दल सौ. साळे यांचे आभार.

कृपया अंक पत्त्यावर द्यावा. वितरीत न झालेस सकारण परत करावा.
अपूर्ण पत्ता ☐ /मयत ☐ /पत्ता सोडून गेले ☐ /पोस्टमन बीट क्र. ☐

प्रेषक :
**श्री. अंजुमन खान**
फेस्कॉम उपाध्यक्ष व प्रमुख, फेस्कॉम मनोयुवा कौन्सिल
अ/७, सुभाषनगर, ता. मिरज, जि. सांगली – ४१६ ४३७.
मोबा. ९४२२५८३००४

**PRINTED MATTER**

प्रति,
______
______
______